# शाहिरी परंपरा

## कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर

(आकाशवाणी जळगांव केंद्रा वरून दिलेले भाषण आकाशवाणीच्या सौजन्याने)

1969 (?)

शाहिरी परंपरा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे एक मौल्यवान लेणे आहे। महाराष्ट्राचा खरा जिव्हाळा त्याच्या वाङमयातील लावण्या पोवाड्यातून जितका दृष्टिस पडतो तितका दुसऱ्या कुठल्याही। वाङमय प्रकारात आढळणार नाही। इंग्रजी अंमल सुरू होई पर्यंत या दोन्ही वाङमयप्रकारास चांगली तेजी होती। लावणी सामन्यतः समाजस्थिती वर्णनपर असे तर पोवाडा इतिहासपर असे।

शाहिरी कलेचा उगम नक्की केव्हा झाला हे सांगणे कठिण असले तरी तो अत्यंत पूर्वी झाला आहे यात शंका नाही। उत्तरेत शाहिराला भाट म्हणातात। ऐतिहासिक कालापासून शाहिरी कला प्रचलित असल्याचे उल्लेख आहेत। महाराष्ट्रात शिवशाही-पासून तो पेशवाईपर्यंत शाहिरीकला लोकप्रिय होती, परंतु त्या अगोदरही ही वैशिष्ट्यपूर्ण लोककला अस्तित्वात असावी असे काही संशोधकांना वाटते। पोवाडा या शब्दाची निश्चित व सर्वमान्य अशी व्याख्या अभावानेच आढळते। “पवाड” या शब्दाचा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे व तिथे तो “जोरात ओरडून सांगणे” या अर्थी वापरला आहे। हल्लिच्या “पोवाडा” या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्यात आहे की नाही ही शंकाच आहे। पोवाडा या शब्दाची व्युत्पत्ती शोधून काढणे मनोरंजक ठरेल।

एका दृष्टिने पोवाडा हा लोकसंगीताचा इतिहास सांगणारा अत्यंत प्रभावी प्रांगणीय प्रकार म्हणावा लागेल। मराठमोळा साधा साज, डफावरील थाप, तुणतुण्याची तार व साभिनय आवेशपूर्ण वीरश्रीयुक्त प्रसंग गाऊन श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे करणारे काव्य म्हणजे पोवाडे, अस्सल झुणका भाकरीची लज्जत असलेले! हे लोकसंगीतं शिवशाहीत तानाजी मालुसरे यांनी कोंडाण्यास

वेढा घातला त्यावेळी पोवाडे गाऊन मोगल सैन्याचे डेरे, मेटकरी फितूर करून कोंडणा सर केला, अशी आख्यायिका आहे।

बाहिरजी नाईक हे तर शाहीर असून उत्तम बहूरूपी पण होते। शिवाजीच्या पदरी अज्ञानदास व तुळसीदास हे दोन शाहीर होते। शाहिरी वाङमयाचा उत्कर्ष स्वातंत्र्याच्या उत्कर्षा बरोबरच होतो। शिवाजीने शौर्य गाजवले व अज्ञानदासाने तुणतुणे वाजविले। तानाजीने देह धारातिर्थी ठेवला नसता तर तुळसीदासाचा हात डफावर पडल नसता! स्वरज्याचे वाढते वैभव म्हणजे पोवाड्यांचा जणू वसंतच बहरलेला! वीरश्रीची विद्युल्लता चमकवून शत्रूपक्षाला लोळवून आणि विजयाची माळ गळ्यात घालून घरी आल्यावर राजाने आपल्याला गौरविल्यावर व संसाराच्या सुखशय्येवर पहुडल्यावर एकादा शाहीर भाट किंवा चारण आपल्या वाड्याच्या अंगणात आपण गाजविलेल्या पराक्रमाची शब्द चित्रे भावनंनी रंगवीत आहे आणि त्यात अभिनयाने जिवन्तपणा आणीत आहे। अशा प्रससंगी कोणास उमदा घोडा तर कोणास शेरभर सोन्याचा तोडा, कुणाला अंगावरील शेला, शिरताज, वतने, ईनामे व वर्षासने बहाल करणारे मराठा सरदार, उमराव धन्य होत। अशा प्रकारचा उल्लेख दा.न.शिखरे यांनी केसरीमधील लेखात केला होता। त्यानंतर पेशवाईतील अखेरची रावबाजी घेतली तरी तिच्या समृद्ध आश्रयावर राम जोशी, होनाजी, सगनभाऊ, परशराम व प्रभाकर हे शाहिरी पंचक आपल्या पोवाड्याचा पंचम लावीतच होते।

नंतर मात्र काळ बदलला।पेशवाई बुडाल्यावर महाराष्ट्राचा इतिहासच संपल्यामुळे शाहिरी वाङमयापैकी पोवाड्यांची प्रभा बहूतेक संपुष्टात आली किंबहुना नामशेष झाली, लावणी मात्र समाजस्थितीदर्शक असल्याने त्यानंतरहि बराच काल टिकून राहीली।श्री राव बर्वे यांनी लिहिलेला एक पोवाडा १४-४-१९५१ च्या ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाला। तत्कालीन वातावरण दाखविणारा व साहेबाविरूद्ध असलेला हा पोवाडा महत्वाचा आहे।

पोवाडे वाङमय हल्लिच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे श्रेय श्री शाळिग्राम, शितूत व य.न.केळकर यांच्या परिश्रमास जाते। परन्तू या महत्वपूर्ण विषयावर चिकित्सक दृश्टीने संशोधन फारच कमी झाले आहे। शिवाजी विद्यापीठात एका

प्रबंधास डॉक्टरेट मिळाली तर श्री गंगाधर मोरजे यानी मराठी लावणी या विषयावर संशोधनपूर्वक प्रबन्ध लिहिला।

श्री य.न.केळकर यांनी माझ्या एका पोवाड्याच्या प्रस्तावनेत या विषयावर उहापोह केला आहे। ते म्हणतात की पेशवाईच्या अस्तानंतर पन्नास पाऊणशे वर्षानंतर इंग्रजी ज्ञानाने नवी दृष्टी प्राप्त झालेली चिपळूणकरादी जी विद्वान व देशनिष्ठ पिढी निर्माण झाली तीनेच इतिहासाचे एक साधन म्हणून पोवड्यांचा पूनरुद्धार केला। त्यामुळेच इतिहासाचे ज्ञान होण्यास मदत होऊन पोवड्याबद्दल पुन्हा सुशिक्षितात प्रेम उत्पन्न झाले।

त्याही पुढील काळात स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या देशभक्ताने मतप्रचाराचे एक उत्कृष्ट साधन म्हणून पोवाड्यांचा उपयोग केला।आधुनिक कालातील पोवाड्यांचे तेच पहिले प्रणेते होत. परंतू चळवलीचे साधन असल्याने नावाखेरीज त्यात जुन्या पोवाड्याचे स्वरूप नव्हते सुशिक्षितांच्या भाषेत लिहिलेले वीररसपूर्ण ऐतिहासिक काव्य असेच त्याचे वर्णना करावे लागेल।

पण त्या कालानंतर पुन्हा पोवाड्यांच्या स्वरूप-रचनेत बदल होण्याचा प्रसंग आला। या कालात अनेक लेखकांनी पोवाड्यांविषयी लिहून, अभ्यासकरून जुना साज कायम ठेवून पोवाडा निर्माण करावा पण जरूर तितकाच, भाषेत वगैरे फेरफार करावा पण चाली, शैली, भाषा ढंग ही सर्व जूनी राखण्यातच पोवाड्यांचे वैशिष्ट्य आहे, त्यातच खरी खुमारी आहे हे पटवून दिले। त्याच वेळी पुण्यास शिवाजी जयंती उत्स्ववाच्या निमित्ताने दोन तीन वर्षे फार मोठ्या प्रमाणावर जुन्या गोन्धळी, शाहिरांना आमन्त्रीत करून मोठे फड होवून, जुन्या पोवाड्यांची लज्जत काय आहे हे सप्रयोग दाखविण्यात आले। आणि तेंव्हापासून सुशिक्षित वर्गातले कवी, गवई व हौशी लोकही सरसावून पुढे आले व स्वातंत्रपूर्वकालात दिसणारी शाहिरी परम्परा फोफावली।

यात उल्लेखनीय नाव म्हणजे श्री गोविंद गोपाळ देसाई यांचे “शिवाजी अवतरले कसे” हा पोवाडा गावून त्यांनी सुवर्णपदक मिळवले। खेड जिल्ह्हा रत्नागिरी येथील शाहीर रामचंद्र दळवी खूप प्रसिद्ध होते। कोल्हापूरचे लहरी हैदर हे ही एक प्रतिभाशाली शाहीर होते।

माझ्या समकालीन प्रसिद्ध शाहीर म्हणजे खाडिलकर, नानिवडेकर, मुचाटे, मुळे, दिक्षित इत्यादी। शाहीर निकम, अमर शेख, गव्हाणकर, अण्णा भाऊ साठे पिराजीराव सरनाईक, आत्माराम पाटील, साबळे वगैरे प्रसिद्ध नामावली सर्व परिचीत आहे।

स्वातंत्रपूर्व काल हा पोवाड्यांच्या दृष्टीने पुन्हा उत्कर्षाचा ठरला। पोवाड्याद्वारा या कालात देशभक्तिची ज्योत प्रज्वलीत होवून पारतंत्र्याच्या बेड्या, शृन्खला तोडण्यास पोवाडे मदतरूप झाले। स्वदेशप्रिती, पारतंत्र्याबद्दल चीड असे विषय मिळल्याने ही कला फोफावली आणि जनजागृती साठी तिचा समर्पक उपयोग झाला। गणेशोत्स्व हे पोवाडे गायनाचे उत्तम माध्यम त्यावेळी उपयोगात आणले गेले।

स्वातंत्र्योत्तर कालात मात्र पोवाडे मागे पडले याची मला खंत वाटते। त्याला अनेक कारणे आहेत। परंतु या कलेची अशीच हेळसांड झाल्यास व तिला पुरेसे उत्तेजन न मिळल्यास महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक महत्वाचा वारसा कालाच्या उदरात गडप होईल।

सर्वांनीच या कामात मदत केली पाहिजे।

प्रथम आपल्या विश्वविद्यालयातील मराठी विभागांनी मनात घेवून आधुनिक पोवाडे वाङमयावर सनंशोधन करून डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहावेत। गेल्या पन्नास पाऊणशे वर्षांतील पोवाडे वाङमयाचा व कलेचा इतिहास लिहिणे अत्यंत आवश्यक आहे। तमाशा कलेस शासन उत्तेजन देते तसेच पोवाड्यास स्वतंत्रपणे उत्तेजन देवून उत्कृष्ट शाहिरांचा गौरव करणे महाराष्ट्र शासनाने मनावर घ्यावे। शाळेतील क्रमिक पुस्तकात एकादा तरी पोवाडा असावा व तो विद्यार्थ्यांना म्हणून दाखवावा। अजुनही खेड्यापाड्यातून आढळणारी ही कला जतन करून ठेवली पाहिजे। महाराष्ट्र सारस्वताचे हे मूल्यवान लेणे जतन करून संस्कृती रक्षण करण्याचे काम कोण करणार?